# <u>काला</u>

पडतील फाके आता कुठले दही लोणी
पुटपुटू लागे पेंद्या चघळा आठवणी
घालती गोप गराडा म्हणती सांग कान्हा
बडबडतो आहे काय खुळा बावळट हा ||१||

खरे आहे म्हणे कान्हा पेंद्या जे म्हणतो ते
मैया म्हणे चोराची आई चोरटी असते
म्हणून आज पासून सोडू आपण चोरी
आपलेच आपण घेणे नसे चोरी जरी ||२||

आंबील भाकर दही पोहे मागा आईला
आणा आई देते जे हवे लोणीच कशाला
दुसऱ्या दिनी साऱ्यांनी आणले जे खायाला
करी कान्हा एकत्र वाटे साऱ्यां असा काला ||३||

– नारायण
१०/१४/२३